CNR No. MHRG120000542021 नियमीत दिवाणी दावा क्र. ६/२०२१
रामचंद्र वि. काशिनाथ

## निशाणी क्र. १३ कडील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम ९ नुसार न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करण्याकरीता दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, दावा मिळकत मौजे तेलवडे येथील सर्व्हे नं. २/४ या हिस्सा नं. २ क्षेत्र ०-१६-० हे आर पोट खराब ०-०४-० हे आर या मिळकतीवर प्रतिवादीने साधारणतः एक ते दिड गुंठा अतिक्रमण केले आहे. त्यामुळे वादीने तालुका निरीक्षक भुमि अभिलेख म्हणून न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक होण्यासाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादीने प्रस्तूत अर्जास आपले म्हणणे दाखल केले नाही. वादी तर्फे विद्वान वकील श्री. बी. जी. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी तर्फे विद्वान वकील श्रीमती एम. एस. सतविडकर यांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तूतचा दावा अतिक्रमण दुर करुन कब्जा परत मिळण्यासाठी दाखल करण्यात आला असल्यामुळे दाव्याचा निकाल गुण-अवगुणावर लागण्यासाठी दावा मिळकतीवर अतिक्रमण आहे का आणि असल्यास किती ही बाब अभिलेखावर येणे आवश्यक आहे. जरी या अगोदर मोजणी झाली असली तरी सदर मोजणी प्रस्तूतचा दावा दाखल करण्याच्या अगोदर झाली असल्यामुळे प्रस्तूतच्या दाव्याकामी सध्यास्थितीत अतिक्रमण आहे का असल्यास किती? हे पाहणे आवश्यक ठरते. त्यामुळे सदर मिळकतीची मोजणी करण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करणे आवश्यक दिसून येते. करिता मी खालील आदेश पारीत करतो -

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. उप अधिक्षक भुमि अभिलेख, मुरुड यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे तेलवडे येथील सर्व्हे नं. २/४ या हिस्सा नं. २ क्षेत्र ०-१६-० हे आर पोट खराब ०-०४-० हे आर या मिळकतीमध्ये प्रतिवादीने अतिक्रमण केले आहे का? असल्यास किती

अतिक्रमण केले आहे? याबाबत नकाशासह सुस्पष्ट अहवाल सादर करावा असा निर्देश देण्यात येतो.

४. न्यायालयीन आयुक्त यांनी कमिशनचे काम करण्यापूर्वी वादी व प्रतिवादी यांना नोटीस द्यावी.

५. वादीने दिनांक ०२/०३/२०२३ तत्पूर्वी पर्यंत नियमानुसार कमिशन फी भरावी.

६. न्यायालयीन आयुक्त यांनी दिनांक ०९/०३/२०२३ पूर्वी पर्यंत आपला अहवाल न्यायालयात सादर करावा.

७. येणे प्रमाणे न्यायालयीन आयुक्तांना पत्र जारी करण्यात यावे.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

SANDEEP G SARODE

Digitally signed by SANDEEP G SARODE
Date: 2023.02.16 11:47:30 +0530

(सं. गं. सरोदे)

दिनांक : १६/०२/२०२३ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड